महाराष्ट्र शासन

क्रमांक:- एनजीसी-२००५/(५६८ /०५)/ मशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक:- १८ ऑगस्ट, २००५

प्रति,
कुलसचिव,
मुंबई/ पुणे/ नांदेड/ अमरावती /
नागपूर/एस.एन.डी.टी. विद्यापीठ,

विषय:- **अध्यापक महाविद्यालय सुरु करण्याबाबत..**

संदर्भ:- शासनाचे क्र. अमवि-२००४/(२७१/०४)/ मशि-३, दि. ६ ऑगस्ट, २००४

महोदय,

राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद , भोपाळ यांनी सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील संस्थांना अध्यापक महाविद्यालय सन २००५-०६ या वर्षापासून काही अटी व शर्तींवर मान्यता दिली आहे. सदर मान्यता लक्षात घेऊन उपरोक्त संस्थेस शासनाकडे भविष्यात अनुदानासाठी वा इतर आर्थिक बाबीसाठी मदत मागणार नाही अशा आशयाचे हमीपत्र संबंधित विद्यापीठ व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, यांचेकडे सादर करण्याच्या अटीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (५) नुसार सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षापासून **कायम विना अनुदान तत्वावर** नवीन अध्यापक (बी.एड.) महाविद्यालय एन. सी. टी. ई. भोपाळ यांनी दिलेल्या मान्यतेनुसार सुरु करण्यास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे.

१. एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी विहित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.
२. संबंधित संस्थेस शासनाने नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे काय, तसेच एन.सी.टी.ई. भोपाळ यांच्या मान्यतेच्या पत्राची खातरजमा विद्यापीठाने करणे आवश्यक राहील.

२. आपले लक्ष शासनाच्या संदर्भाधीन दिनांक ६ ऑगस्ट , २००४ च्या पत्राकडे वेधण्यात येत आहे. त्यानुसार वरील अटींबाबत खातरजमा केल्यानंतरच विद्यापीठाने संलग्नीकरण देण्याबाबतची आवश्यक असलेली पुढील कार्यवाही करुन पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण , महाराष्ट्र राज्य , पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक यांना कृपया पाठवावा.

आपला ,

(स्वाक्षरी)

( बि. वा. सुतार )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य , पुणे.
संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
खाजगी सचिव, मा. मंत्री (उच्च शिक्षण)
खाजगी सचिव , मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.)
अध्यक्ष, सोबत जोडलेल्या विवरणापत्रातील संस्था
निवड नस्ती - मशि-३

C:\MASHI-3\Orders\New B.Ed. College Permission\Paschim Maharashtra & other 5 Sanstha-2005-06 formal orders.doc

Scanned by CamScanner

क्र. एनजीसी-२००५/(५६८/०५)/ मशि-३, दि. १८.८.२००५ चे सहपत्र

| अ.क्र | संस्थेचे नांव | विद्यापीठाचे नांव | शासनाने नाहरकत प्रमाणपत्र दिल्याचा दि. | एन.सी.टी.ई भोपाळ यांनी मान्यता दिल्याचा पत्राचा संदर्भ क्र.व दि. |
|---|---|---|---|---|
| १. | अमर सेवा मंडळ, सक्करदरा, नागपूर | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | ३०१२.२००३ | WRC/2-32/123241/76/2005/6312 dt. 9th August, 2005 |
| २. | कस्तुरबा मोमीन मल्टिपर्पज सोसायटी, बोरगांव, वर्धा | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | ९.९.२००४ | WRC/2-32/123222/76/2005/6311 dt. 9th August, 2005 |
| ३. | शाहू शिक्षण संस्था, पंढरपूर | एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई | ३०.१२.२००३ | WRC/2-32/123151/75/2005/5823 dt. 22nd July, 2005 |
| ४. | हनुमान व्यायामशाळा क्रिडा मंडळ, यवतमाळ | अमरावती विद्यापीठ | ३०.१२.२००३ | WRC/2-32/123088/76/2005/6374 dt. 9th August, 2005 |
| ५. | संजीवनी प्रतिष्ठान, मुंबई | पुणे विद्यापीठ | १७.७.२००४ | WRC/2-32/123157/76/2005/6325 dt. 9th August, 2005 |
| ६. | अभय शिक्षण केंद्र, विक्रोळी, मुंबई | मुंबई विद्यापीठ | १७.७.२००४ | WRC/2-32/123234/6/2005/6336 dt. 9th August, 2005 |
| ७. | शरद- प्रतिभा प्रतिष्ठान, नांदेड | स्वा.रा.ती. विद्यापीठ, नांदेड | ३०.१२.२००३ | WRC/2-32/123198/75/2005/5948 dt. 28th July, 2005. |

Scanned by CamScanner